| शिक्षण संचालनालय<br>(माध्यमिक व उच्च माध्यमिक)<br>महाराष्ट्र राज्य<br>मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१ | सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | Government of Maharashtra<br>DIRECTORATE OF EDUCATION<br>(Secondary & Higher Secondary)<br>Maharashtra State<br>Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-1 |
|---|---|---|

w'site : education.maharashtra.gov.in Phone : (020) 2612 0361 e-mail : doehighersec@gmail.com

**क्र.विद्या-ए-1/11.प्रवेश/2020/**
**दिनांक-10/08/2020**

**प्रति,**
**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
**मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर**

**विषय- इ.11वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन.2020-21 वेळापत्रक व प्रवेशाचे कार्यवाहीबाबत.**

**संदर्भ-** शासन निर्णय क्र.प्रवेश-२०१८/प्रक्र.३३३/एसडी-२ दि.२३/०६/२०२०

राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांतील इ.11वी चे प्रवेश केंद्रिय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहेत सदर प्रवेश प्रक्रियेअंतर्गत कोटा प्रवेश/ शून्य फेरी, केंद्रिय प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्या याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत त्यानुसार कार्यवाही करावी.

1. कोटांतर्गत (व्यवस्थापन कोटा, इनहाऊस कोटा, अल्पसंख्याक कोटा) प्रवेश उच्च माध्यमिक विद्यालय स्तरावरुन केले जातील, त्यासाठी शून्य फेरीचे सुरुवातीस आयोजन केले जाईल. कोटा प्रवेशाची सुरुवात शून्य फेरीपासून होईल.
2. कोटांतर्गत राखीव जागा गुणवत्तेनुसार भरण्यात येतील आणि रिक्त जागा भरणे व प्रतयार्पित करणेबाबत कार्यवाहीसाठी वेळोवेळी सुचना देण्यात येतील. (शून्य फेरी वेळी विद्यार्थ्यांनी केंद्रिय नियमित फेरीसाठी पसंतीक्रम देणे सुरु असेल.)
3. शून्य फेरीनंतर केंद्रिय प्रवेश प्रक्रियेमध्ये पुढीलप्रमाणे प्रमुख फेऱ्या आयोजित केल्या जातील-
   1.नियमित फेऱ्या (तीन)- प्रचलित निकषांनुसार गुणवत्ता, आरक्षण व पसंतीक्रम विचारात घेऊन तीन प्रवेश फेऱ्या होतील.
   2.विशेष फेरी- नियमित तीन फेऱ्या संपल्यानंतर विशेष फेरीचे आयोजन होईल. सदर फेरी सर्वांसाठी खुली असेल.
4. प्रत्येक फेरीपुर्वी विद्यार्थ्यांना पसंतीक्रम देता अथवा बदलता येतील (किमान-1 व कमाल-10 पसंतीक्रम देता येतील).
5. नियमित फेऱ्यांमध्ये विद्यार्थ्यांने दिलेला पसंतीक्रमानुसार प्रथम पसंतीचे उच्च माध्यमिक विद्यालय प्रवेशासाठी मिळाल्यास प्रवेश घेणे बंधनकारक असेल आणि प्रथम पसंतीक्रम मिळूनही प्रवेश निश्चित केला नाही तर संबंधित विद्यार्थ्याचा पुढील नियमित फेऱ्यांसाठी विचार केला जाणार नाही अशा विद्यार्थ्यांस नियमित फेऱ्या-3 संपेपर्यंत विशेष फेरीसाठी थांबावे लागेल. प्रथम पसंतीक्रम न मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे अथवा नाकारण्याचे स्वातंत्र्य असेल.
6. द्विलक्षी विषयांचे प्रवेश नियमित फेऱ्या संपल्यानंतर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधून उच्च माध्यमिक विद्यालय स्तरावर करण्यात येतील. त्यासाठी समांतर प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल.
7. उच्च माध्यमिक शाळांनी कोटा प्रवेश गुणवत्ता यादी जाहीर करणे व इतर बाबींसाठी ऑनलाईन पद्धतींचा अवलंब करावा.
8. विद्यार्थ्यांने कोणत्याही कोट्यातून प्रवेश निश्चित केल्यास त्याचा अर्ज पुढील प्रवेश प्रक्रियेतून वगळण्यात येईल.
9. कोटा प्रवेशासाठी संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयांनी, प्रवेश देण्यासाठी त्यांची स्वतंत्र ई-यंत्रणा निर्माण करावी. सदर सुविधा पुढील फेरीवेळी प्रवेशासाठही चालू ठेवाव्यात.
10. अर्ज सादर करणे तसेच प्रवेश निश्चित करणेसाठी विद्यार्थ्यांना समक्ष बोलावू नये तसेच विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये जाणे टाळावे त्यासाठी फोन अथवा इतर संपर्क साधनांचा वापर करावा.
11. उच्च माध्यमिक विद्यालयांनी त्यांचे संकेतस्थळ असल्यास तशी नोंद अथवा इतर ऑनलाईन माध्यमातून प्रवेश करणार असल्यास तशी नोंद प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर करावी. सदर नोंदी विद्यार्थ्यांना प्रवेशास जाण्यापूर्वी दर्शविण्यात येतील व प्रवेश प्रक्रिया सुरक्षित व सुलभ होईल.
12. केवळ माध्यमिक शाळा सोडल्याचा दाखला नाही म्हणून विद्यार्थ्याचा प्रवेश थांबविता येणार नाही. त्यासाठी संबंधित माध्यमिक शाळेशी संपर्क साधावा.

**सोबत वेळापत्रक- शून्य फेरी व नियमित फेरी-1**

**(दिनकर पाटील)**
**शिक्षण संचालक**
माध्यमिक व उच्च माध्यमिक